**अतारांकित प्रश्नोत्तरांची २६ वी यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**अहमदनगर जिल्ह्यातील मुलींच्या शासकीय वसतीगृहाची झालेली दुरवस्था**

**(१) १६१ (२८-०४-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाज कल्याण विभागांमार्फत चालविण्यात येणाऱ्या मुलींच्या वसतीगृहासाठी प्रत्येकी एक महिला गृहपाल असणे बंधनकारक असताना अहमदनगर जिल्ह्यातील बारा मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहासाठी अवघ्या तीनच महिला गृहपाल कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील वसतिगृहासाठी तीनच महिला गृहपाल कार्यरत असल्याने प्रत्येकीकडे चार वस्तीगृहाची जबाबदारी असल्याने वस्तीगृहातील मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त जिल्ह्यातील वसतीगृहासाठी १६० पदे मंजूर असताना केवळ ७९ पदावर कर्मचारी कार्यरत असून सुमारे ८१ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त वसतिगृहांमध्ये निम्म्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत तर काही ठिकाणी नादुरुस्त असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (१३-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात समाज कल्याण विभागामार्फत एकूण १८ शासकीय वसतिगृहे व ६ ऊसतोड मुलां-मुलींसाठीची ६ वसतिगृहे अशी एकूण २४ वसतिगृहे कार्यरत आहेत. त्यापैकी मुलींची शासकीय वसतिगृहे ९ व ऊसतोड कामगार मुलींची वसतिगृहे ३ अशी एकूण १२ मुलींची वसतिगृहे कार्यरत आहेत. सदर वसतिगृहांकरिता २ महिला गृहपाल कार्यरत असून, त्यांचेकडे प्रत्येकी २ वसतिगृहांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. तसेच प्रशासकीय व्यवस्थेसाठी अपरिहार्य कारणास्तव उर्वरित ६ मुलींच्या वसतिगृहांचा कार्यभार पुरुष गृहपाल यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.

(३) हे खरे नाही.

जिल्ह्यातील वसतिगृहांसाठी एकूण १३७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ६३ पदे भरलेली असून, ७४ पदे रिक्त आहेत.

(४) हे अंशत: खरे आहे.

जिल्हयातील मुलींच्या १२ वसतिगृहापैकी ७ शासकीय वसतिगृहामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे चालू असून उर्वरित वसतिगृहाकरिता सी.सी.टी.व्ही. संच बसविण्यासाठीच्या प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य युवा धोरणातील शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२) १७१ (३०-०४-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय युवा धोरणाच्या धर्तीवर शासनाने स्वतंत्र राज्य युवा धोरण दिनांक १३ जून, २०१२ रोजी वा त्यासुमारास जाहीर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त धोरणातील युवकांसाठी असलेल्या ४० शिफारशींपैकी केवळ सहा शिफारशीसंदर्भात शासनाने कार्यवाही करुन शासन निर्णय निर्गमित केले असून अद्यापही ९०% शिफारशींवर शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य युवा धोरणातील शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत शासानाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०५-०९-२०२५) :** (१) होय.
(२) व (३) युवा धोरणातील शिफारसींनुसार युवक कल्याण संदर्भात विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. तसेच, अन्य विभागांमार्फत युवा धोरणातील शिफारसींनुसार योजना राबविण्यात येत आहेत. तसेच उक्त युवा धोरणाला ११ वर्षे झाल्याने सुधारित युवा धोरण तयार करण्यासाठी मा. मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी व रायगड जिल्हयातील खारवी समाजाने गुहागर येथे मोर्चा काढल्याबाबत

**(३) १८५ (२६-०४-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी व रायगड जिल्हयातील खारवी समाजाने एकत्र येऊन दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास आपल्या मागण्यांचे निवेदन तहसीलदार, गुहागर यांना देऊन मोर्चा काढला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मोर्चा कोणकोणत्या मागण्यांसाठी काढण्यात आला होता, आणि त्या मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नितेश राणे (१०-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दिनांक २८.१०.२०२४ रोजी मौजे साखरी आगर, ता. गुहागर, जि. रत्नागिरी येथील मच्छिमार श्री. रविंद्र का. नाटेकर यांच्यावर त्यांच्याच बोटीवरील खलाशी जयप्रकाश विश्वकर्मा यांने जिवघेणा हल्ला करुन त्यांची हत्या

केली. सदर घटनेचा खटला जलदगती न्यायालयात चालवावा व आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी, ही व इतर ३२ मागण्यांबाबत मोर्चा काढण्यात आला होता. पोलीस विभागामार्फत आरोपीस अटक करण्यात आली असुन याची नोंद पोलीस ठाणे, देवगड येथे घेण्यात आली आहे. मोर्चाव्दारे केलेल्या मागण्यांच्या अनुषंगेने पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्धवेत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील देवघर (ता. गुहागर) आणि दहिवली (ता. चिपळूण) येथील क्रीडा संकुलांची दुरूस्ती करणेबाबत**

**(४) १९३ (३०-०४-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील देवघर (ता. गुहागर) आणि दहिवली (ता. चिपळूण) या दोन ठिकाणी क्रीडा संकुले बांधण्यात आली परंतु त्या ठिकाणी नेमण्यात आलेले ठेकेदार आणि जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्यामधे समन्वयाचा अभाव व दुर्लक्षामुळे सद्यस्थितीत ही क्रीडा संकुले नादुरूस्त तसेच विनावापर पडून आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोन्ही क्रीडा संकुलांची दुरूस्ती करून खेळाडू व क्रीडाप्रेमींच्या वापराकरीता उपलब्ध करून दयावीत, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्रान्वये जिल्हा क्रीडा अधिकारी, रत्नागिरी यांचेकडे दिनांक ०१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१८-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही,
(२) होय
(३) तालुका क्रीडा संकुल, गुहागर आणि तालुका क्रीडा संकुल, चिपळूण या क्रीडा संकुलांना शासन निर्णय दिनांक २३/०३/२०२२ अन्वये रु.३००.०० लक्ष सुधारित अनुदान मर्यादेनुसार अद्ययावत क्रीडा सुविधा निर्माण करणेकरिता अंदाजपत्रक व आराखडे सादर करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कार्यवाही सुरु आहे. सदर प्रस्ताव प्राप्त होताच शासन निर्णय दिनांक २३ मार्च, २०२२ अनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील एकाही कृषी विद्यापीठाचा राष्ट्रीय मानांकन संरचना संस्था (एनआयआरएफ) मानांकन यादीमध्ये समावेश नसल्याबाबत**

**(५) २२५ (२५-०४-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील कृषी विद्यापीठांच्या सन २०२४ या वर्षाच्या 'राष्ट्रीय मानांकन संरचना संस्था' (नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क) मानांकन यादीमध्ये राज्यातील एकाही कृषी विद्यापीठाचा समावेश नसल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'राष्ट्रीय मानांकन संरचना संस्था' च्या नामांकन यादी मध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा ३५ वा क्रमांक होता, तो सुद्धा या २०२४ च्या यादी मध्ये टिकवण्यात राज्यातील कृषी विद्यापीठांना अपयश आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात कृषी शिक्षण व संशोधनाची मुख्य जबाबदारी ज्या पाच कृषी विद्यापीठावर आहे त्यापैंकी एकही विद्यापीठ नामांकन यादीमध्ये न आल्या बद्दल या पाच कृषी विद्यापीठाच्या व अन्य कृषी विद्यापीठांच्या कुलगुरुना अपयश आले आहे, हे ही खरे हे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनाचे कृषी विद्यापीठांची मानांकन करण्याबाबत नियम व अटी असून त्याची पूर्तता आपल्या राज्यातील कृषी विद्यापीठे करु शकत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच ग्रामीण भागातील कृषी विद्यापीठात अपुऱ्या सुविधा असणे, मनुष्य बळ, निधी व सुविधांचा असलेला अभाव, ५० टक्के पेक्षा कमी असलेले मनुष्य बळ, संशोधन प्रकल्प व त्याला लागणारा निधी इत्यादी अपुऱ्या व्यवस्था इ. अनेक महत्त्वाच्या कारणामुळे राज्यातील कृषी विद्यापीठे स्पर्धेमध्ये टिकून राहू शकत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर अपयश मिळण्याबाबत व याचा खुलासा सुद्धा न मागण्याची कारणे काय आहेत,

(७) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन राज्यातील कृषी विद्यापीठांमधील अधोगती रोखण्यासाठी तसेच या सर्व त्रुटी दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (३०-०९-२०२५) :** (१) होय,

(२), (३), (४), (५), (६) व (७)

सन २०२४ या वर्षात राष्ट्रीय मानांकन संरचना संस्थेने (NIRF) प्रसिध्द केलेल्या मानांकन यादीत राज्यातील कृषि विद्यापीठांचे स्थान तुलनेत घसरले असले तरी, राज्यातील कृषि विद्यापीठांकडून कृषि शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता राखण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. याशिवाय संशोधन व विस्तार शिक्षणामध्ये देखील सातत्य राखण्याच्या दृष्टीने विद्यापीठांकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. विद्यापीठांची जनमानसातील प्रतिमा उंचावण्याकरिता विद्यापीठांच्या उपक्रमांची माहिती प्रसार माध्यमांवर, तसेच सामाजिक माध्यमांवर प्रसृत करण्यात येते.

विद्यापीठांकडून वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत असली तरी, विद्यापीठांची अलीकडच्या कालावधीतील कामगिरी तितकीशी समाधानकारक नसल्याने मानांकन यादीत विद्यापीठांचे मानांकन घसरल्याचे निर्दशनास येते.

राज्य शासनाने सदर बाबीची गंभीर दखल घेतली असून, राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांचा शैक्षणिक, संशोधनात्मक आणि गुणात्मक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनांबाबत संबंधित कृषि विद्यापीठांशी समन्वय साधून त्याबाबतचा अहवाल आपल्या शिफारशींसह शासनास तात्काळ सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद यांना देण्यात आल्या आहेत.

याखेरीज, कृषि विद्यापीठांमध्ये रिक्त असलेली अध्यापकीय पदे व इतर अनुषंगिक पदे भरण्याकरिता या सर्वच विद्यापीठांमधील पदांचा आकृतीबंध अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**कोकणातील मच्छिमारांच्या मिळकत पत्रिका व सनद देण्याची कार्यवाही संथगतीने सुरू असल्याबाबत**

**(६) २८९ (२६-०४-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा

खुलासा करतील काय :-
(१) कोकण प्रदेश, मुंबई विभागात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे व पालघर या जिल्हयात महास्वामित्व अभियानांतर्गत १४३ गावामध्ये मच्छिमार बांधवांच्या मिळकती आढळून आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापैकी किती मच्छिमार बांधवांना मिळकत पत्रिका व सनद देण्यात आली आहे तसेच गावठाण परिसिमेतील किती मच्छिमार बांधवांना मिळकत पत्रिका व सनद देण्याचे प्रलंबित आहे
(३) असल्यास, उक्तप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने मच्छिमार बांधवांना मिळकत पत्रिका व सनद देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-१२-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

महास्वामित्व अभियांनांतर्गत कोकण प्रदेश, मुंबई विभागात रत्नागिरी जिल्हयात २१, रायगड जिल्हयात १९५, ठाणे जिल्हयात ३१ व पालघर जिल्हयात ५० अशा एकूण २९७ गावांमध्ये मच्छिमार बांधवांच्या मिळकती आढळून आल्या आहेत.
(२) रत्नागिरी जिल्ह्यात एकूण २१ गावांपैकी १३ गावांचे काम पूर्ण होऊन १२९१ सनदा तयार झाल्या आहेत. त्यापैकी ९८७ सनदा वाटप करण्यात आल्या असून उर्वरीत ३०४ सनदा देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच उर्वरीत गावांचे काम प्रगतीत आहे.

रायगड जिल्ह्यात एकूण १९५ गावांपैकी ९७ गावात प्रत्यक्ष स्वामित्व योजना राबविण्यात येणार आहे. सदर ९७ गावांपैकी ४५ गावांचे काम पूर्ण होऊन ६०६६ सनदा तयार करण्यात आल्या आहेत. त्यापैकी १६८२ सनदा वाटप करण्यात आल्या असून उर्वरीत गावांचे काम प्रगतीत आहे.

ठाणे जिल्ह्यात ३१ गावात मच्छिमार बांधवांच्या मिळकती असून ३ गावांमध्ये पुर्वीच नगर भूमापन झालेले असून २१ गावे महानगरपालिकांमध्ये समाविष्ट आहेत. त्यामुळे उर्वरित ७ गावात स्वामित्व योजना राबविण्यात येणार आहे. त्यापैकी ५ गावात स्थानिकांचा विरोध असून मौजे डुंगे गावामधील १०२ सनदा तयार असून ३६ सनदांचे वाटप करण्यात आले आहे. मौजे कशेळी गावचे जी.टी.जी.आय.एस. काम पूर्ण करण्यात येऊन जीआयएस नकाशा अंतिम मान्यतेसाठी सर्व्हे ऑफ इंडिया यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे.

पालघर जिल्ह्यात एकूण ५० गावांपैकी २१ गावांमध्ये ३६४० सनदा वाटप करण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत गावांचे काम प्रगतीत आहे.
(३) उर्वरित मच्छिमार बांधवांना कालबद्ध कार्यक्रमानुसार सनदा वाटप करण्याची व मिळकत पत्रिका नागरिकांना digitalsatbara.mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याची दक्षता घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## साखरी आगर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील मच्छीमार जेटीचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(७) २९४ (२६-०४-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साखरीआगर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील सुमारे १२ वर्षांपासून प्रलंबित असलेले मच्छिमार जेटीचे काम माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये सुरू करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुढील जेटीच्या बांधकामाच्या डिझाईन संबंधित विभागाकडून कंत्राटदाराला देण्यात न आल्याने

मागील ३ महिन्यांपासून जेटीचे बांधकाम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने प्रलंबित असलेल्या बांधकामाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नितेश राणे (०९-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही, मौजे साखरी आगर ता. गुहागर जि. रत्नागिरी येथे कार्यान्वयन यंत्रणा पत्तन अभियंता, रत्नागिरी पत्तन विभाग, रत्नागिरी असून मच्छिमांरासाठी सुविधा पुरविणे या कामास सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय दिनांक २४/०५/२०२२ अन्वये, समुद्र धुपप्रतिबंधक बंधारे बांधकाम या लेखाशिर्षाअंतर्गत रु.८.४३ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक१७/०७/२०२३ रोजी देण्यात आले आहेत. सदर काम प्रत्यक्षात नोव्हेंबर २०२३ मध्ये प्रत्यक्ष सुरू करण्यात आले असल्याचे पत्तन अभियंता, रत्नागिरी पत्तन विभाग, रत्नागिरी यांनी कळविले आहे.
(२) हे खरे नाही. सदर कार्मातर्गत बांधावयाच्या जेट्टीचे आर.सी.सी. संकल्पचित्र मा. मुख्य अभियंता, (संकल्पचित्र), सा.बां. विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांचेकडून दिनांक २०/०८/२०२४ रोजी प्राप्त झाले असून सदर संकल्पचित्रामुळे (Design) जेट्टीचे काम बांधकाम प्रलंबित नसल्याचे कार्यान्वयन यंत्रणा असलेली पत्तन विभाग, रत्नागिरी यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**छत्रपती संभाजीनगर येथील समाजकल्याण विभागाच्या**
**शासकीय वसतीगृहाची झालेली दुरवस्था**

**(८) ३५४ (२९-०४-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर येथील समाजकल्याण विभागाच्या १००० विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाची मा. सामाजिक न्याय मंत्री यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास पाहणी केली, हे खरे आहे काय,
(२) तसेच मा. सामाजिक न्याय मंत्री यांनी पुणे व पिंपरी-चिंचवड येथील २५० क्षमतेच्या मुलींच्या शासकीय वसतिगृहाला भेट देऊन पाहणी केल्यानंतर वसतिगृहातील असुविधेबाबतही ठेकेदारावर कारवाई करण्यात येणार असल्याची घोषणा दिनांक २९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाची वाईट अवस्था झाली असून या वसतीगृहात अस्वच्छ बाथरूम, नळ, तुटलेल्या तोट्या, फुटलेल्या काचा, आडोसा लावलेल्या खिडक्या, रिकाम्या पाण्याच्या टाक्या, वसतिगृहाच्या मागच्या बाजूस असलेली घाण, स्वयंपाक घराजवळील फुटलेले ड्रेनेज इत्यादी असुविधेचे अनेक प्रश्न या वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी मा. सामाजिक न्याय मंत्री यांच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील शासकीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाची सुधारणा करण्याबाबत तसेच ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्याविरोधात कारवाई करणे बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (२७-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

मा. मंत्री (सा. न्या.) महोदयांनी दिनांक २८ डिसेंबर, २०२५ रोजी २५० मुलींचे शासकीय वसतिगृह, मोशी, भोसरी, जि. पुणे या वसतिगृहास भेट देऊन वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थीनींशी चर्चा केली असता या वसतिगृहातील भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता, इत्यादी बाबत प्रवेशित विद्यार्थींनीची कोणत्याही प्रकारची गैरसोय होत नसल्याचे निदर्शनास आले असून विद्यार्थ्यांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

(३) व (४) मा. मंत्री (सा.न्या.) महोदयांनी छत्रपती संभाजीनगर शहरातील किलेअर्क येथील वसतिगृहास दिलेल्या भेटीदरम्यान आढळून आलेल्या असुविधांच्या अनुषंगाने शासन ज्ञापन, दिनांक ८ जानेवारी, २०२५ अन्वये सदर वसतिगृहाच्या इमारत दुरुस्तीसाठी रु.४.९९ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

तसेच सदर प्रकरणी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या स्तरावर चौकशी करण्यात आली असून संबंधित वसतिगृहाचे गृहप्रमुख यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यानंतर विभागीय चौकशीच्या अधीन राहुन संबंधित गृहप्रमुख यांना सेवेत पुनःस्थापित करण्यात आले आहे.

सदर वसतिगृहाच्या इमारतीत आढळून आलेल्या अस्वच्छतेबाबत संबंधित कंपनीकडून एकुण रु.१.५० लक्ष दंड आकारण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त व बीट निरीक्षक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेली अटक

**(९) ४४० (२७-०४-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील इमारत अनधिकृत असल्याची नोटीस जारी केल्यानंतर कारवाई थांबविण्यासाठी दीड लाख रुपयांची लाच मागणाऱ्या महापालिकेचा सहायक आयुक्त यांच्यासह प्रभारी बीट निरीक्षक यांना मुंबई पोलिसांच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाचेच्या रकमेपैकी ५० हजार रुपये घेताना दोघेही सापळयात अडकलेले असल्याने संबंधित सहाय्यक आयुक्त व बीटनिरीक्षक यांची विभागीय चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०९-२०२५) :** (१) होय खरे आहे.

(२) व (३) होय.

लाचलुचपत प्रकरणी अटक झालेल्या भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेचे प्रभारी सहाय्यक आयुक्त व प्रभारी बीट निरीक्षक यांना निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द महानगरपालिकेच्या स्तरावर विभागीय चौकशी सुरू करण्यात आली असून महानगरपालिकेच्या दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजीच्या आदेशान्वये चौकशी अधिकारी नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंठा (जि.अहिल्यानगर) तालुक्यात पोषण आहार निधी अपहार प्रकरणी मुख्याध्यापकांविरुद्ध कारवाई करणेबाबत**

**(१०) ४९७ (०५-०५-२०२५). श्रीमती सरोज अहिरे (देवळाली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंठा तालुक्यात (जि.अहिल्यानगर) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेची ऑनलाईन कामे मुख्याध्यापकांनी प्रलंबित ठेवून लहान बालकांच्या पोषण आहार निधीचा अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून दिनांक ३० एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास सुचित करण्यात येवूनही पाटोदा (बु), पांगरी (खुर्द) पश्चिम तांडा यासह २७ शाळांमधील मुख्याध्यापकांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने अंतिमत: दिनांक १७ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास शासनाने त्यांचेविरुध्द कारवाई केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने त्याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-०५-२०२५) :** (१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देवूनही २७ मुख्याध्यापकांनी सदर लाभाची नोंद ऑनलाईन पोर्टलमध्ये अपूर्ण ठेवल्यामुळे संबंधित मुख्याध्यापकांना नोटीसा देण्यात आल्या होत्या.

(२), (३), (४) संबंधित सर्व मुख्याध्यापकांना योजनेच्या कामकाज अपूर्ण राहणार नाही याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना संबंधित गटशिक्षणाधिकारी यांनी दिल्या आहेत. सदर सूचनांनुसार मुख्याध्यापाकांनी योजनेचे कामकाज केल्यामुळे त्यांच्यावर कोणतीही कारवाई प्रस्तावित करण्यात आली नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीला दरवर्षी महापूर येऊन नागरी जीवनावर विपरीत परिणाम होत असल्याबाबत**

**(११) ५२८ (२५-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीला दरवर्षी महापूर येऊन नागरी जीवनावर विपरीत परिणाम होत असून जिवीत व वित्तहानी रोखण्यासाठी खाजगी संस्थेच्या माध्यमातून सुरु असलेले सर्वेक्षण पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्वेक्षणाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दरवर्षी महापुराचा सामना करणा-या नागरीकांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) (०३-१२-२०२५) :** (१), (२) कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा, भीमा खोऱ्यातील पूर आपत्ती नियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम

(MRDP) प्रकल्प राबविण्यात येत आहे. पुर विषयक उपाययोजना करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तांत्रिक सल्लागार सेवा घेण्यासाठी करार करण्यात आला आहे. सर्व्हेक्षणाचे काम सुरु असुन सदर सर्वेक्षण LIDAR Drone Technology ने करण्यात येत आहे. प्रकल्पांतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचेमार्फत खाजगी तांत्रिक सल्लागार सेवा संस्थेच्या माध्यमातून सर्वेक्षणाचे काम सुरु आहे. पंचगंगा नदीचे एकुण ८१ किमी लांबीमधील सर्वेक्षण पुर्ण झाले आहे. तथापि कर्नाटक सीमेपासुन हिप्परगी बॅरेजपर्यंत कृष्णा नदीचे सर्वेक्षण पुर्ण झाल्यानंतर निश्चित उपाययोजना करणेबाबत निर्णय घेतला जाणार आहे.
(३) तांत्रिक सल्लागाराद्वारे प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर आणि त्यास जागतिक बँकेची मान्यता प्राप्त झाल्यानंतर निश्चित उपाययोजना केली जाणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सेलू (जि.परभणी) तालुक्यातील सर्व तलाठी सज्जांना दिलेले संगणक कालबाह्य झाल्याबाबत

**(१२) ६०९ (२६-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेलू (जि.परभणी) तालुक्यातील प्रशासन गतीमान आणि लोकाभिमुख करण्यासाठी तसेच पेपरलेस कामकाज करण्यासाठी तलाठी सज्जांना आठ वर्षापूर्वी दिलेले संगणक कालबाह्य झाले असल्याने संबंधित गावातील तलाठ्यांना ऑनलाईन कामकाज करतांना अनेक अडचणी येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील अनेक तलाठी कार्यालयांना नवीन तलाठ्याची नेमणूक करण्यात आल्यानंतर त्यांना अद्यापही शासनाकडून संगणक, लॅपटॉप व प्रिंटर देण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतक-यांची कामे वेळेत व सुलभ होण्यासाठी शासनाने सेलू तालुक्यासह परभणी जिल्ह्यातील सर्व तलाठी सज्जांना अद्ययावत तंत्रज्ञानासह नवीन संगणक, लॅपटॉप व प्रिंटर देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-१२-२०२५) :** (१), (२) व (३) परभणी जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) व मंडळ अधिकारी यांच्यासाठी ३३९ लॅपटॉप व ३३९ प्रिंटर उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी कार्यालयाने जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिनांक २६.०९.२०२५ च्या पत्राव्दारे कळविले आहे.

ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) व मंडळ अधिकारी यांच्यासाठी GeM पोर्टलव्दारे लॅपटॉप व ऑल इन वन प्रिंटर व licenses of MS Office/M३६५ app खरेदी करण्याबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावर निविदा प्रक्रिया राबविण्यास व त्यानुसार खरेदी करण्यास महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २२.०८.२०२५ व शासन शुध्दीपत्रक दिनांक २६.०८.२०२५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर खरेदीसाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावरून दिनांक ०४.०९.२०२५ रोजी GeM पोर्टलवर नॉर्मल बीड प्रसिध्द करण्यात आली आहे.सदर खरेदीनंतर जिल्हाधिकारी, परभणी कार्यालयास लॅपटॉप व ऑल इन वन प्रिंटर व licenses of MS Office/M३६५ app उपलब्ध करून देण्यात येतील.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील शासकीय कार्यालयात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करुन अधिकारी / कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल केल्याबाबत**

**(१३) ६२६ (२६-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात माहे जानेवारी ते १८ डिसेंबर, २०२४ या कालावधीत विविध शासकीय कार्यालयात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) १३ ठिकाणी कारवाई करुन १७ लाचखोर अधिकारी व कर्मचारी यांच्यावर संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लाचखोर अधिकारी यांचेवर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा लाचखोर अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१०-२०२५) :** (१), (२) व (३) I. परभणी जिल्हयात माहे जानेवारी ते १८ डिसेंबर, २०२४ या कालावधीत विविध शासकीय कार्यालयात लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत केलेल्या कार्यवाही मध्ये एकूण १२ आरोपी लोकसेवक व ०५ खाजगी इसम यांच्याविरुद्ध लाच मागणी केली/स्विकारली म्हणून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) अन्वये एकूण १३ गुन्हयांची नोंद करुन कारवाई करण्यात आली आहे.

II. सदर प्रकरणी एकूण १२ शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचे संबंधित विभागामार्फत सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निलंबन करण्यात आलेले असून १ बाह्य खाजगी कर्मचारी यांची सेवा समाप्त करण्यात आलेली आहे.

III. तसेच लाचेच्या अनुषंगाने गुन्हा दाखल झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध अभियोगपुर्व मंजुरी तसेच शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रकरणी संबंधित प्रशासकीय विभागाकडून प्रचलित कार्यपद्धतीनुसार उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर - कोराडी मार्गावरील जिल्हा सामान्य रुग्णालयाचे काम पूर्ण करणेबाबत**

**(१४) ७४७ (२८-०४-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर - कोराडी मार्गावरील जिल्हा सामान्य रुग्णालयास शासनाने सन २०१५ मध्ये मंजुरी दिली असून याकरीता निधीही मंजूर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयाचे बांधकाम अद्याप पूर्ण झालेले नसून आवश्यक वैद्यकीय तज्ज्ञ, साधनसामग्री, रुग्णवाहिका (Ambulances), शववाहिका (Shav Vahika), शवागार (Mortuary), कॅन्टीन आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती झालेली नसून पाणीपुरवठा आणि अग्निशमन विभागाच्या मंजुरी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे कय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयात पद भरतीसाठी प्रस्ताव शासनाच्या उच्चस्तरीय समितीकडे प्रलंबित असल्याची

बाब माहे डिसेंबर, २०२४ च्या शेवटच्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने माहिती घेऊन रुग्णलयाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१७-०९-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर रुग्णालयात पदभरतीसाठीचा नाही तर पदनिर्मितीसाठीचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीपुढे ठेवण्यात आला होता. त्यास उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिल्यानंतर सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि-२०२३/ प्र.क्र.२५७/आरोग्य-४, दिनांक १३.२.२०२५ अन्वये जिल्हा रुग्णालय, नागपूर साठी १९७ पदांची निर्मिती करण्यांत आलेली आहे. पाणी पुरविठयाकरीता ४ इंच नळ जोडणी व मीटर लावण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांना कळविले आहे. तसेच अग्नीशमन विभागाची मंजूरी प्राप्त झाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

**नवी मुंबई पोलीस मुख्यालयातील पोलिसांनी कर्तव्यस्थानी उपस्थित न राहता वेतन घेतल्याबाबत**

**(१५) ९२८ (२६-०४-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई पोलीस मुख्यालयातील सुमारे १२५ पोलिसांनी घरी बसून वेतन घेतल्याचा प्रकार माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एखाद्या ठिकाणी दंगल किंवा विशेष घटना घडल्यास तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्याला संरक्षण देण्याकरिता आणिबाणीच्या वेळी वापरता यावे असे मनुष्यबळ पोलीस मुख्यालयात असते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहिती अधिकार कायद्यांतर्गत मिळालेल्या माहितीनुसार काही कर्मचारी पैसे देऊन कर्तव्यस्थानी उपस्थित न होता केवळ कागदावर नोकरी करतात तसेच कामाच्या वेळेत प्रत्यक्षात मात्र ते घरी असतात किंवा या वेळेत खासगी कामे करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) एखाद्या ठिकाणी दंगल किंवा विशेष घटना घडल्यास तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्यांला संरक्षण देण्याकरीता आणिबाणीच्या वेळी वापरण्याकरीता पोलीस मुख्यालयामध्ये मनुष्यबळ राखीव नसते. त्याकरीता जलद प्रतिसाद पथक व दंगल नियंत्रण पथक अशी पथके सतर्क असतात.
(३) व (४) या विषयासंदर्भात साप्ताहिकामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), नवी मुंबई यांच्या स्तरावरुन चौकशी करण्यात आली असून सदर तक्रारीमध्ये कोणतेही तथ्य आढळून आले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिवती व गौंडपिपरी जि. चंद्रपूर येथील ग्रामीण रुग्णालयातील समस्याबाबत.**

**(१६) ९४१ (२८-०४-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील जिवती तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाची नवीन इमारत पूर्ण झाली असून त्यास सोयीसुविधा व फर्निचर कामाकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, राजुरा यांनी दिनांक २१ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, जिल्यातील गौंडपिपरी येथील ग्रामीण रुग्णालयाच्या मुख्य इमारतीच्या बांधकामाला मान्यता मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, राजुरा यांनी दिनांक १७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१८-१०-२०२५) :** (१) सदर निवेदन विभागास अप्राप्त आहे.

(२) होय,

(३) ग्रामीण रूग्णालय जिवती येथील रूग्णालयाचे बांधकाम G+१ (तळमजला व पहिला मजला) असे आहे. यापैकी तळमजल्याचे बांधकाम पूर्ण झाले आहे. उर्वरीत पहिला मजला बांधकामाचे अंदाज व आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सादर करण्यात येत आहेत. सदर रूग्णालयासाठी आवश्यक वैद्यकीय उपकरणे, साधन सामुग्री व फर्निचर खरेदी करण्याबाबतची कार्यवाही महाराष्ट्र वैद्यकिय वस्तु खरेदी प्राधिकरणामार्फत सुरू आहे. तसेच ग्रामीण रूग्णालय जिवती येथे पदनिर्मिती करण्यास शासन निर्णय दिनांक १३.०२.२०२५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

ग्रामीण रूग्णालय गौंडपिपरी येथील मुख्य इमारत बांधकामाचे अंदाज व आराखडयाबाबतचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे आरळा (ता.शिराळा, जि.सांगली) येथील रस्ता तयार करण्यासह ओढ्यावर छोटा पूल बांधण्याकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(१७) १०१७ (२५-०४-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आरळा (ता.शिराळा, जि.सांगली) येथे शेरीतून ओढ्याच्या पलीकडे जाणारा रस्ता बंद करुन दुसऱ्या मार्गाने मातंग समाजाच्या घराकडे तसेच शेतकऱ्यांसाठी शेतीत जाण्याकरीता अगदी जवळ असलेला कच्चा रस्ता सध्या अस्तित्वात असून सन २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सदरहू रस्ता पूर्णपणे खराब झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्ता सुस्थितीत तसेच ओढ्यावर पूल नसल्याने गावातील वृध्दांना, महिलांना शेतातून

जनावरांकरीता दररोज वैरण घेवून येत असताना तसेच अनेक अल्पभूधारक शेतकऱ्यांना त्यांच्या शेती मशागतीकरीता शेती अवजारे, काढणीस आलेली ऊस, भात व मका ही शेती पिके, गोवर व इतर रासायनिक खते टाकण्यासाठी ओढ्यातून कोणताही मार्ग नसल्याने त्याचप्रमाणे शेतमजूरांची असलेली टंचाई पाहता शेतकऱ्यांना खूप अडचणींना व आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्ता कायमस्वरुपी करण्यासाठी त्याची नोंद शासन स्तरावर करुन तसेच ओढ्यावर छोटा साकव बांधण्याबाबत पाठपुरावा होणेकामी स्थानिक शेतकऱ्यांनी अप्पर मुख्य सचिव व उप सचिव, ग्रामविकास विभाग तसेच प्रधान सचिव तसेच उप सचिव, रोजगार हमी योजना विभाग तसेच ग्रामसेवक, आरळा यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी सन २०२३ मध्ये केली असून तसेच लोकप्रतिनिधीकडून प्रश्न देखील उपस्थित करण्यात येवूनही प्रशासनाकडून अक्षम्य दुर्लक्ष व दिरंगाई झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त ठिकाणच्या स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणींच्या अनुषंगाने तेथील रस्ता व छोटा पूल बांधण्याच्या कामास तात्काळ मंजूरी देण्यासह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (१७-११-२०२५) :** (१) होय,

(२) होय,

(३) होय अंशत: खरे आहे. त्या संदर्भात नागरीकांचे निवेदन प्राप्त झाले आहे. प्रस्तावित रस्त्याची नोंद ग्रामपंचायतीच्या नमुना नं.२३ मध्ये नाही. तसेच महसूल विभागाच्या दप्तरी देखील नोंद नाही सबब, मग्रारोहयो अंतर्गत प्रस्ताव सादर करता आला नाही. त्यामुळे प्रशासनाकडून अक्षम्य दुर्लक्ष वा दिरंगाई झाल्याची बाब वस्तुस्थितीस धरुन नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जामखेड (जि.अहिल्यानगर) येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करणेबाबत

**(१८) १०४५ (२८-०४-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामखेड (जि.अहिल्यानगर) येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामाचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील पंचायत समितीच्या जुन्या व जीर्ण झालेल्या इमारतीत शासकीय दवाखाना, ग्रामीण रुग्णालय व बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना हे सहा खोल्यातून सुरू असल्याने अपुऱ्या जागेमुळे अत्यंवस्थ (इमर्जन्सी) रुग्ण व अपघात झालेल्या रुग्णांना जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबबात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर रुग्णालयाचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१७-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.

जामखेड, जि. अहिल्यानगर येथील १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालय इमारत बांधकामाच्या रु. ४६९७.०० लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रक व आराखडयांना शासन निर्णय दिनांक २२ जून, २०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर नवीन इमारतीच्या बांधकामास दिनांक २२ जुलै, २०२२ पासून सुरुवात झालेली असून ७० टक्के बांधकाम पूर्ण झालेले आहे.

(२) अंशतः खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, जामखेड येथे अपघात झालेल्या रुग्णांची तपासणी करुन औषधोपचार करण्यात येतो. तसेच रुग्णांना आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयास संदर्भित केले जाते.

(३) जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्या दौऱ्या दरम्यान त्यांनी जामखेड येथील श्रेणीवर्धीत १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालय इमारतीचे बांधकाम वेळेत पूर्ण करण्याबाबत ठेकेदारास सूचना दिलेल्या आहेत. तसेच वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, जामखेड यांनी सदर बांधकाम वेळेत पूर्ण करण्याबाबत दिनांक १३.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागास कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची थकबाकी प्रलंबित असल्याबाबत

**(१९) १०४७ (३०-०४-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शेकडो कोटी रुपयांची थकबाकी बिगर शेती संस्थांकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त थकबाकी वसूल करून बँकेकडे असलेल्या जुन्या रु.५०० व रु. १००० च्या नोटा अद्यापपर्यंत रिझर्व बँकेने स्वीकारल्या नसल्याने त्या स्वीकारण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (२२-०८-२०२५) :** (१) होय

(२) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सांगली या बँकेचा दिनांक ३१ मार्च, २०२४ अखेर एकूण एन.पी.ए. रु. ५२,९९२.५५ लाख इतका आहे. सदर एन.पी.ए. वसुलीकरीता सर्व थकीत बिगरशेती संस्था, युनिट व व्यक्तीगत कर्जदार यांचेवर सेक्युरिटायझेशन ॲक्ट- २००२, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९१ व कलम १०१ अन्वये वसुलीची कारवाई बँकेमार्फत सुरु आहे. सदर कारवाई दरम्यान दिनांक ०१ एप्रिल, २०२४ ते दिनांक ३१ जानेवारी, २०२५ अखेर रु. ९,६६४.७५ लाख इतकी वसुली बँकेने केली आहे. तसेच दिनांक ३१ मार्च, २०२२ अखेर बँकेच्या ग्रॉस एन.पी.ए. चे प्रमाण १४.३४ टक्के होते ते दिनांक ३१ मार्च, २०२४ अखेर ८.५८ टक्के इतके झाले आहे. सदर एन.पी.ए. चे प्रमाण ५ टक्के च्या आत आणण्यासाठी बँकेकडुन प्रयत्न सुरु आहेत.

त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने सांगली, नाशिक, कोल्हापूर, पुणे, अहिल्यानगर, नागपूर व वर्धा या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी दाखल केलेल्या याचिकांमध्ये एकत्रित सुनावणी घेऊन संबंधित बँकांनी केंद्र शासनाकडे विनंती अर्ज सादर करण्याबाबत दिनांक २१.०३.२०२३ रोजी आदेश दिले आहेत. सदर विनंती

अर्जावर केंद्र शासनाने १२ आठवड्यात निर्णय घ्यावा व केंद्र शासनाच्या निर्णयाने बँकांचे समाधान न झाल्यास बँकांनी संबंधित उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका दाखल करण्याबाबत निर्णय दिला आहे. या निर्णयानुसार संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर केले असून सदर प्रस्ताव केंद्र शासन स्तरावर प्रलंबित आहे.

जिल्हा बँकांकडे शिल्लक असलेल्या विमुद्रीकृत/निश्चलनीकरण केलेल्या रुपये ५००/- व रुपये १०००/- च्या नोटा रिझर्व बँकेने स्विकारण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील महापालिका रुग्णालयांमध्ये कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कंत्राट कालावधीचे नुतनिकरण करणेबाबत**

**(२०) १०५५ (०१-०५-२०२५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनेक महापालिका रुग्णालयांमध्ये कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या फार्मासिस्ट, लॅब टेक्नीशिअन, कम्युनिस्ट डेव्हलपमेंट ऑफिसर आणि इतर तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या कंत्राट कालावधीचे नुतनीकरण न झाल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांचे नुतनीकरण न झाल्याने या रुग्णालयात येणाऱ्या असंख्य रुग्णांची गैरसोय होत असून बहुतांश चाचण्या रुग्णांना बाहेरून कराव्या लागत आहेत तसेच पूर्व उपनगरातील एका रुग्णालयात क्षयरुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनीहि कराराचे नुतनीकरण न केल्यामुळे येणे बंद केले असल्याने त्याचा थेट परिणाम क्षयरुग्णांच्या संख्येवर झाला असल्याचे ही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कर्मचाऱ्यांचे मागील काही काळापासून वेतन थकलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनान चौकशी करुन कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कंत्राट कालावधीचे नुतनीकरण करुन थकलेले वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.

बा.य.ल नायर धर्मा. रुग्णालयात फक्त प्रयोगशाळा सहाय्यक या पदांचा कंत्राट व कालावधी संपुष्टात आलेला आहे. सदर अनुसूचित पदे, अनअनुसूचित पदे व अतिरिक्त पदे यांचा कंत्राट कालावधी दोन वर्षाकरीता वाढविण्याबाबतचा प्रस्ताव कार्यान्वित आहे.

रा. ए. स्मा. रुग्णालयातील फार्मासिस्टए लॅब टेक्निशियनए कम्युनिस्ट डेव्हलपमेंट ऑफिसर व तांत्रिक संवर्गातील कंत्राटी तत्त्वावर घेण्यात आलेल्या कर्मचा-यांचा कंत्राट कालावधी संपुष्टात आलेला नसून सदर पदावर कार्यरत कर्मचा-यांची नियुक्ती अद्याप सुरू आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील विविध संवर्गातील पदे जसे फार्मासिस्ट, लॅब टेक्नीशिअन, कम्युनिस्ट डेव्हलपमेंट ऑफिसर आणि इतर तांत्रिक पदे अनुसूचीवरील रिक्त पदांच्या सापेक्ष कंत्राटी पध्दतीने रुग्णालयाच्या आस्थापनानिहाय भरली जातात व त्यांची कालमर्यादा वेळोवेळी सक्षम प्राधिका-यांच्या

मान्यतेने वाढविली जाते. माहे डिसेंबर २०२४ नंतर पुढील कालमर्यादा वाढविताना सर्व पदांची सर्वसमावेशक मंजूरी प्रस्तावित असून सदर मंजुरीसापेक्ष कार्यरत कर्मचा-यांना मुदतवाढ दिली आहे.

| रुग्णालयाचे नाव | फार्मासिस्ट | लॅब टेक्नीशिअन | कम्युनिस्ट डेव्हलपमेंट ऑफिसर | इतर तांत्रिक |
|---|---|---|---|---|
| बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय | -- | ०३ | -- | ०८ |
| रा.ए.स्मा. रुग्णालय | १० | ६८ | ७ | २७ |
| लो.टि.म.स. रुग्णालय | १० | २३ | ९ | -- |
| रु.न. कूपर रुग्णालय | ०३ | ०८ | ०५ | -- |

(२) हे खरे नाही.

माध्यमिक आरोग्य सेवा येथे क्षयरोग तज्ञ यांना कंत्राटी तत्वावर नेमण्याची मंजुरी प्राप्त करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून त्यांची नेमणूक करण्यात येत आहे व रुग्णांची हेळसांड होणार नाही यासाठी नियमित आस्थापनेवरील कार्यरत डॉक्टर व इतर तज्ञांमार्फत त्यांच्यावर उपचार केले जातात.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खानापूर व आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील महावितरणाच्या बाह्यसेवा कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी करण्यात आल्याबाबत**

**(२१) १०८५ (२६-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत, खानापूर व आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील महावितरणाच्या बाह्यसेवा कामगार पुरवणाऱ्या ठेकेदारांच्या मनमानी कारभारामुळे बाह्यसेवेमध्ये असणाऱ्या बहुतांश कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे उक्त तालुक्यातील वीज देयक वसूली, तक्रार निवारण, नविन वीज जोडणी इत्यादी कामांना विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही कली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२५) :** (१) जत, खानापूर व आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील महावितरणाच्या बाह्यसेवा कामगार पुरवणाऱ्या ठेकेदारांच्या मनमानी कारभारामुळे बाह्यसेवेमध्ये असणाऱ्या बहुतांश कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हयातील खानापूर, आटपाडी व तासगांव तालुक्यात रुपांतरित साठवण तलाव बांधणेकरीता निधी उपलब्ध करणेबाबत

**(२२) १०९६ (२४-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील खानापूर, आटपाडी व तासगांव तालुक्यात पाझर तलावाचे साठवण तलावामध्ये रुपांतरित करण्यासाठी निधी मिळण्याकरिता लोकप्रतिनिधिंनी मा. मृद व जलसंधारण मंत्री यांना दिनांक ०७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यामध्ये टेंभू योजनेचे काम प्रगतीपथावर असून पाझर तलावाचे साठवण तलावामध्ये रुपांतर करणे गरजचे असून हा पाणी साठा झाल्यास शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदरहू रुपांतरित साठवण तलाव बांधणेकरीता तात्काळ निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०५-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पाझर तलावाचे मूळ उद्दीष्ट ना-दुरुस्त पाझर तलाव भू-जल, पुर्नभरण करणे असा आहे. त्यामुळे साठवण तलावात रुपांतर न करता ना-दुरुस्त पाझर तलावाचे लोकप्रतिनिधीनी मागणी केल्याप्रमाणे पाझर तलावांची दुरुस्ती आवश्यकतेनुसार करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खानापूर, आटपाडी व तासगांव (जि.सांगली) तालुक्यात पर्यटन स्थळांना प्रादेशिक पर्यटन विकास योजनेमधून निधी मिळण्याबाबत

**(२३) १०९९ (२६-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील खानापूर, आटपाडी व तासगांव तालुक्यात पर्यटन स्थळांना प्रादेशिक पर्यटन विकास योजनेमधून निधी मिळण्याकरिता लोकप्रतिनिधिंनी मा. पर्यटन मंत्री यांचेकडे दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार निवेदनाच्या अनुषंगाने पर्यटन स्थळांना निधी उपलब्ध होण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (०४-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत प्राप्त प्रस्ताव राज्य पर्यटन विकास समितीसमोर ठेवण्यात येतात. पर्यटन विभाग शासन निर्णय दिनांक २८/१०/२०२५ अन्वये सांगली जिल्ह्यातील आटपाडी व खानापूर तालुक्यातील रु. २००.०० लक्ष रकमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन रु.५०.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

## खानापूर व आटपाडी (जि.सांगली) येथील शेतकऱ्यांना शेतीकडे जाण्याऱ्या रस्त्यास परवानगी देण्याबाबत

**(२४) ११२० (२६-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर व आटपाडी (जि.सांगली) हद्दीत असलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये जाण्याकरिता असलेला रस्ता वन विभागाने बंद केल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शेतकऱ्यांना शेती करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना शेतीकडे जाण्याऱ्या रस्त्यास परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (०१-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

खानापूर व आटपाडी (जि. सांगली) हद्दीत असलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये जाण्याकरिता असलेला रस्ता वन विभागाने बंद केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील महावितरण कंपनीतील नियमित कंत्राटी कामगारांचा पीएफ व ईएसआयसीची रक्कम भरण्यात न आल्याबाबत

**(२५) १२५९ (२६-०४-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण कंपनीतील नियमित कंत्राटी कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व कामगार राज्य विमा योजनेची रक्कम भरण्यात न आल्याने हजारो वीज कर्मचाऱ्यांपुढे मोठी आर्थिक समस्या निर्माण झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने महावितरण कंपनीतील नियमित कंत्राटी कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी व कामगार राज्य विमा योजनेची रक्कम कामगाराच्या खात्यावर जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

सन २०२४-२५ या कालावधीत महावितरण कंपनीतील सर्व बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारांचा भविष्य निर्वाह निधी व कामगार राज्य विमा योजनेची रक्कम अदा केली नसल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) नाही.

(३) महावितरण कंपनीमध्ये बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटदार संस्थेमार्फत कंत्राटी पध्दतीवर कामगारांच्या सेवा

घेण्यासंदर्भातील निविदा/ कंत्राट याबाबतचे सुधारीत निर्देश तसेच कामगारांना वेळेत व त्यांच्या बँक खात्यामध्ये किमान वेतन व अनुषंगिक भत्ते मिळण्यासाठी सुधारीत कार्यपध्दती प्रशासकीय परिपत्रक क्र.५३६, दिनांक ०२.०५.२०१६ अन्वये करण्यात आली आहे. बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारांची सर्व वैधानिक देणी उदा- भ.नि.नि. (PF) कामगार राज्य विमा योजना (ESIC) इत्यादीचा भरणा अदा केल्याची चलने तपासणी केल्यानंतरच बाह्यस्त्रोत संस्थेची बिले अदा करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेकडून दिव्यांगाना मिळणारा निधी प्रलंबित असल्याबाबत**

**(२६) १२७४ (०१-०५-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेकडून दिव्यांगाना वर्षाला रु.२४ हजार इतका निधी मिळत असून मागील दोन वर्षापासून निधी न मिळाल्याने दिव्यांगांनी महानगरपालिका कार्यालयासमोर माहे जानेवारी, २०२५ मध्ये आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिव्यांगांनी दिलेल्या निवेदनात महानगरपालिकेकडून वर्षाला रु.२४ हजार इतका निधी देणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे व इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दिव्यांगांच्या मागण्या पूर्ण करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

दिव्यांग संघटनांनी अनुदान मिळण्याकरिता माहे जानेवारी,२०२५ मध्ये आंदोलन केले होते.

शासन निर्णय,नगरविकास विभाग, दिनांक १०.०५.२०१८ अन्वये दिव्यांग व्यक्तींकरिता दारिद्र्य निर्मुलन योजनेतर्गत ५ % निधी राखीव ठेवण्याची तरतूद आहे.त्यानुसार ठाणे महानगरपालिकेकडून दिव्यांगांसाठी तरतूद ठेवण्यात येते. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात रक्कम रु.२५,२९,३६,०००/- इतके अनुदान (लाभार्थी संख्या-१०७१७) अदा करण्यात आलेले आहे.सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रक्कम रु.१४,५४,३९,५००/- इतके अनुदान (लाभार्थी संख्या-१२१४७) अदा करण्यात आलेले आहे.
(२) अंशत: खरे आहे.

जुनी पेन्शन योजना लागू करणेबाबतची मागणी संघटनांच्या निवेदनात नमूद नाही.
(३) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात दिव्यांग व्यक्ती कल्याणकारी योजनांकरिता मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीच्या मर्यादेत राहून प्रत्यक्ष उपलब्ध तरतूद विचारात घेऊन सर्व योजनांच्या पात्र लाभार्थ्यांना समप्रमाणात लाभ देणेकरीता सर्व प्रभाग समितींना एकूण रु. १४,५४,३९,५००/- अदा करण्यात आलेली आहे.

महानगरपालिका स्तरावर संघटनांच्या इतर मागण्याबाबत संबंधित विभागांना उचित कार्यवाहीबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

दिव्यांग समन्वय समिती स्थापन करणेबाबत संघटनांनी मागणी केल्यानुसार महानगरपालिका स्तरावर दिव्यांग समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शाहु फुले व आंबेडकर निवासी अनिवासी शाळा योजनेतील**
**शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत**

**(२७) १३४८ (२८-०४-२०२५). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शाहू, फुले व आंबेडकर निवासी आश्रमशाळांना नियमित वेतनश्रेणीनुसार १६५ आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०० टक्के अनुदान वैयक्तिक मान्यता, संचमान्यता व सेवा सातत्य देण्याबाबतची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील कर्मचाऱ्यांनी उक्त मागण्यांच्या पूर्ततेसाठी मुंबईतील आझाद मैदान येथे दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान आमरण उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (२७-११-२०२५) :** (१) होय.

(२) होय.

(३) शाहू, फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी आश्रमशाळांना अनुदान देण्याच्या अनुषंगाने मा. मंत्री (सा.न्या.) महोदयांकडे दिनांक१३.५.२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मंत्री (सा.न्या.) महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार सदर आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वि.जा.भ.ज. आश्रमशाळांच्या धर्तीवर वेतनश्रेणी तसेच केंद्रीय आश्रमशाळांच्या धर्तीवर मानधन देण्याच्या अनुषंगाने सदर आश्रमशाळांची यु-डायस प्रणालीवरील माहिती तपासून सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली येथील मुलीच्या वसतिगृहातील विद्यार्थिनीने**
**आत्महत्येचा प्रयत्न केल्याबाबत.**

**(२८) १४२० (२८-०४-२०२५). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली येथील मुलीच्या वसतिगृहातील विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृह आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींसाठी असल्याने या वसतिगृहाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुलींच्या वसतिगृहातील सुरक्षेचा आढावा घेऊन वसतिगृहातील मुलींचे मनोधैर्य वाढवण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त वसतिगृहाच्या मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (२७-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) नाही. हे खरे आहे.

मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, हिंगोली येथील घटनेची चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालावरुन त्या विद्यार्थिनीने तिच्या वैयक्तीक व कौटुंबिक ताणतनावातुन गळफास लावुन घेतल्याचे समितीने आपल्या अहवालात नमूद केलेले आहे. तसेच विभागांतर्गत शासकीय वसतिगृहातील प्रवेशित मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रवेशित विद्यार्थीनींना आत्मसंरक्षणासाठी प्रशिक्षण देणे व प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्हा ग्रंथालयात अभ्यासिका आणि इतर सुविधांनी सुसज्ज असलेल्या इमारत बांधकामाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(२९) १५१३ (०५-०५-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा ग्रंथालयात स्पर्धा परिक्षेच्या अभ्यासासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासिका आणि इतर सुविधांनी सुसज्ज असलेल्या तीन मजली इमारतीच्या बांधकामासाठी रु.५.७ कोटी इतक्या निधीचा प्रस्ताव जिल्हा ग्रंथालयाने जिल्हा प्रशासनाकडे पाठविला असूनही सदरील प्रस्ताव गेली दोन वर्षे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या ठिकाणी नवीन इमारत प्रस्तावित आहे त्या ठिकाणी सध्या असलेल्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी तरतूद केली नाही तसेच जुन्या इमारतीचे नुतनीकरण, पेव्हर ब्लॉक घालणे व शौचालये बांधण्याचे प्रस्तावही प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर प्रस्ताव प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०३-१०-२०२५) :** (१), (२) व (३)

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, अकोला कडून अभ्यासिका इमारत बांधकामाचा रु.४.७२ कोटी इतक्या निधीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर केला होता. तथापि, जुन्या इमारतीचे संरचनात्मक लेखा परिक्षण (structural Audit) झाले नसल्याने प्रस्ताव मंजूर होऊ शकला नाही. तदनंतर जुन्या इमारतीचे संरचनात्मक लेखा परिक्षण पूर्ण झाल्याने दिनांक १५.०१.२०२५ रोजीच्या पत्राव्दारे सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला कार्यालयाकडे नव्याने अंदाजपत्रक देण्याची मागणी केली आहे.

सद्यस्थितीमध्ये ज्या जुन्या इमारतीमध्ये अभ्यासिका आहे त्याजागी नवीन इमारत बांधकाम करण्याचे प्रस्तावित असल्याने जुन्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी निधीची तरतूद केलेली नाही. तथापि, जिल्हा ग्रंथालय

अधिकारी, अकोला कार्यालयांतर्गत ग्रंथालयीन सेवा देण्यासाठी अन्य एक इमारत आहे. सदर इमारतीचे नुतनीकरण, पेव्हर ब्लॉक घालणे व शौचालये बांधण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी एकूण रु.४९.५८ लक्ष इतक्या निधीचे अंदाजपत्रक जिल्हा नियोजन समिती, अकोला यांच्याकडे दिनांक २२.०७.२०२४ रोजी सादर केले आहे.

जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांनी दिनांक ०९.०१.२०२५ अन्वये सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठी रु.११.६४ लक्ष आणि पेव्हरब्लॉक घालणे यासाठी रु.११.३६ लक्ष असा एकूण रु.२३.०० लक्ष इतक्या निधीस प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश निर्गमित केले आहेत.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**कोरची व कुरखेडा (जि.गडचिरोली) तालुक्यातील क्रीडा संकुलाचे बांधकामाबाबत**

**(३०) १५४९ (०५-०५-२०२५). श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरची व कुरखेडा (जि.गडचिरोली) तालुक्यात क्रीडा संकुलाचे बांधकाम करण्यासाठी शहराजवळील वन विभागाची ५ एकर जागा वन नियम २/३ अंतर्गत वगळून शासनास उपलब्ध करुन देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,कोरची व कुरखेडा तालुक्यात क्रीडा संकुलाचे बांधकाम करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१८-०९-२०२५) : (**१) व (२) कोरची व कुरखेडा तालुक्यात क्रीडा संकुलाकरिता जागा मिळण्याबाबत संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी, बेडगाव यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**गेवराई येथून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र.६१ ची दुरवस्था झाल्याबाबत.**

**(३१) १६३८ (२५-०४-२०२५). श्री.विजयसिंह पंडित (गेवराई) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्र.६१ (कल्याण-विशाखापट्टनम) या राष्ट्रीय महामार्गाचा मोठा भाग गेवराई विधानसभा मतदार संघातून जात असून या रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे अपघातांच्या संख्येत वाढ होत असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान स्मरणपत्राद्वारे मुख्य अभियंता तथा प्रादेशिक अधिकारी, रस्ते वाहतुक मंत्रालय, नवी मुंबई यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त राष्ट्रीय महामार्गावरील मौजे सिरसदेवी, (ता.गेवराई) गावाजवळ महामार्गा लगतच्या भुमिगत गटारातून पाण्याचा निचरा होत नसल्यामुळे पावसाळ्यात महामार्गावर तलावासारखे पाणी साठून यामध्ये अनेक दुचाकी स्वारासह इतर वाहने क्षतिग्रस्त झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महामार्गाची देखभाल कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग छ.संभाजीनगर यांच्या ऐवजी नाशिक स्थित कार्यालयाकडे सोपविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गेवराई विधानसभा मतदार संघाच्या हद्दीतून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ६१ च्या भागाची दुरुस्तीची कामे करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय असून सदरची दुरुस्ती केव्हा पर्यंत होणे अपेक्षित

आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्ता दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कल्याण-मुरबाड-अहिल्यानगर- नांदेड हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६१ असून देखभाल दुरुस्तीसाठी राष्ट्रीय महामार्ग (सा. बां) विभाग यांच्याकडे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

मौजे सिरसदेवी, (ता.गेवराई) येथील RCC Drain चे काम PBMC च्या व्याप्तीबदल मधून करण्याचे प्रस्तावित केले आहे व सदरील कामे लवकरच पूर्ण करण्यात येईल.
(३) हे खरे नाही.
(४) राष्ट्रीय महामार्ग क्र.६१ गढी-मानवत या महामार्गाचे काम EPC Mode द्वारे दोष दायित्व कालावधीसह दिनांक ३१ मे, २०२३ रोजी पूर्ण झाले आहे.

देखभाल दुरुस्ती (Maintenance) चे काम PBMC (Performance Based Maintenance Contract) ची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक २० ऑगस्ट, २०२५ रोजी पासून सदरील देखभाल दुरुस्तीचे काम हे सुरु झाले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शालेय पोषण आहार निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(३२) १६३९ (०५-०५-२०२५). श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: बुलढाणा व पालघर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि अनुदानित प्राथमिक शाळांमध्ये पोषण आहार योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या मिलेट न्युट्रियंट बार मध्ये अळया आढळून आल्याची व निकृष्ट दर्जांच्या मिलेट न्यट्रियंट बार चे वाटप करण्यात आल्याच्या तक्रारी मुख्याध्यापकांकडून करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यस उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार निकृष्ट दर्जाचे मिलेट न्युट्रियंट बार पुरविणाऱ्या संबंधित कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच, विद्यार्थ्यांना पोषक आहार मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-०५-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत राज्यातील आदिवासी व आकांक्षित १५ जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना मिलेट न्युट्रिटिव्ह बारचा लाभ देण्यात येत आहे. तथापि, यामध्ये बुलढाणा जिल्ह्याचा समावेश नाही. तसेच, पालघर जिल्ह्यामध्ये वाटप करण्यात आलेल्या न्युट्रिटिव्ह बारमध्ये अळया व बुरशी आढळून आल्याची बातमी दैनिक लोकमत या वृत्तपत्रामध्ये दिनांक ०२ डिसेंबर, २०२४ रोजी प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) पालघर जिल्ह्यातील एकूण ३०७० शाळेतील विद्यार्थ्यांना नियमित पोषण आहाराव्यतिरिक्त पुरक पोषण आहार म्हणून मिलेट न्युट्रिटिव्ह बारचे वाटप करण्यात येत आहे. सदर शाळांपैकी दोन शाळांमध्ये वाटप केलेल्या न्युट्रिटिव्ह बारबाबत तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीनंतर सर्व गटशिक्षणाधिकारी यांना यादृच्छिक पध्दतीने शाळांना भेटी देवून पूरक आहाराची तपासणी करण्याबाबत निर्देश दिले होते. तसेच, तक्रार प्राप्त शाळांमधील न्युट्रिटिव्ह बारचे नमूने प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. मिलेट न्युट्रिटिव्ह बारबाबत प्रस्तुत क्षेत्रिय व प्रयोगशाळा तपासणी अहवाल Food Safety and Standard Authority of India (FSSAI) ने निश्चित केलेल्या विनिर्दिष्ठाप्रमाणे आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यात शासकीय विभागात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेली कारवाई

**(३३) १६६० (२६-०४-२०२५). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यात मागील १४ महिन्यात १० शासकीय कार्यालयातील ३० लाचखोर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करुन सुमारे रु.४ लाख ३० हजार इतके रुपये घेत असतांना रंगेहाथ पकडले आहेत, हे खरे आहेत काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१०-२०२५) :** (१) बुलढाणा जिल्ह्यात दिनांक ०१ डिसेंबर, २०२३ ते दिनांक ३१ जानेवारी, २०२५ या मागील १४ महिन्याच्या कालावधीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एकुण १६ सापळा गुन्हे दाखल केले आहेत. दाखल केलेल्या गुन्हयांत विविध शासकीय विभागातील एकूण २२ आलोसे व १ खाजगी इसम यांना एकूण ३,२६,३००/- रुपये मागणी/स्विकारतांना अटक केली असल्याने, संबंधित लोकसेवकांविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) च्या कायद्यान्वये कारवाई करण्यात आलेली आहे.
(२) I. लाचेच्या मागणी संदर्भात किंवा लाचेची रक्कम स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाही प्रकरणी शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) च्या कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात येतो. तदनंतर दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने संबंधित लोकसेवकाविरुद्ध निलंबन, बडतर्फ, शिस्तभंगविषयक कार्यवाही तसेच मा.न्यायालयात खटला दाखल करण्याबाबत अभियोगपुर्व प्रकरणी संबंधित लोकसेवक ज्या प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असतात त्या विभागाच्या सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने प्रचलित नियमानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.

II. सदर प्रकरणी बुलढ़ाणा जिल्ह्यातील लाचेच्या अनुषंगाने गुन्हा दाखल झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध प्रचलित कार्यपद्धतीनुसार संबंधित प्रशासकीय विभागाकडून उचित कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील भांडुप (प.) येथील ड्रीम्स मॉल धोकादायक कोसळण्याच्या अवस्थेत असल्याबाबत

**(३४) १८३८ (२६-०४-२०२५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भांडुप (प.) येथील ड्रीम्स मॉलमध्ये कोरोनाच्या काळात लागलेल्या आगीनंतर या मॉलमध्ये आता स्मोकिंग, प्रेमी युगुलांचे अश्लील चाळे तसेच बेकायदेशीर वाहनांच्या पार्कींगकरीता करण्यात येत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मॉलमध्ये लागलेल्या आगीनंतर सामान चोरी करुन भंगारात विकण्याचे प्रकार चालत असून, आजही तेथे आग लागण्याच्या घटना वारंवार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, या मॉलचा परिसर धोकादायक अवस्थेत असल्याने कधीही कोसळण्याच्या स्थितीत असल्याने याकडे पोलीस व महानगरपालिका प्रशासन जाणुनबुजून दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२५) :** (१) मुंबईतील भांडुप (प.) येथील ड्रीम्स मॉलमध्ये कोरोनाच्या काळात लागलेल्या आगीनंतर सदर ठिकाणी गुन्हे प्रकटीकरण पथक, निगराणी पथक व पोलीस ठाण्यातील बिनतारी वाहनाची गस्त वाढविण्यात आली असल्याने अशा प्रकारच्या घटनांची नोंद नाही.
(२) मॉलमध्ये लागलेल्या आगीनंतर मॉलमधील दुकानामध्ये झालेल्या चोरीच्या अनुषंगाने भांडुप पोलीस ठाण्यात खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत-
१. गु.र.क ६४८/२२, भा.दं.वि., कलम ३८०, ४५४, ४५७,
२. गु.र.क ६२४/२३, भा.दं.वि., कलम ३८०, ३४,
३. गु.र.क ६४८/२४, भा.न्या.सं., कलम ३०३ (२),
४. गु.र.क. ९७३/२४, भा.न्या.सं., कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१ (४),
५. गु.र.क ९७४/२४, भा.न्या.सं., कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१ (४)
(३) व (४) मॉलच्या सुरक्षा व्यवस्था व प्रकाश व्यवस्थेबाबत उपाययोजना करण्याकरिता भांडुप पोलीस ठाणे यांच्याकडून मा.राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (NCLT) यांच्यामार्फत नेमण्यात आलेले प्रशासक यांच्या कार्यालयास तसेच सहायक आयुक्त, एस वार्ड, भांडुप (प.), मुंबई यांना वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर विद्यापीठातील अधिकारी व चतुर्थ श्रेणीतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३५) १८४६ (२८-०४-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विद्यापीठात अधिकारी ते चतुर्थ श्रेणी कर्मचारी अशी एकूण ८६४ पदे मंजूर असून सध्या ३९२

अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपु-या कर्मचारी वर्गामुळे कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कामाचा प्रंचड ताण पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यापीठातील ४७२ रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत विद्यापीठ अधिसभेत निर्णय घेण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नागपूर विद्यापीठातील अधिकारी व चतुर्थ श्रेणीतील ४७२ रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१२-११-२०२५) :** (१) हे खरे नाही. नागपूर विद्यापीठात अधिकारी ते चतुर्थ श्रेणी कर्मचारी अशी एकूण १०९२ पदे मंजूर असून त्यापैकी ४५४ पदे कार्यरत आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) विद्यापीठ अधिसभेत असा निर्णय घेण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भांडुप (पश्चिम) मुंबई येथील ड्रिम्स मॉलच्या बेसमेंटमध्ये महिलेचा मृतदेह सापडल्याबाबत**

**(३६) १८८२ (२६-०४-२०२५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील भांडुप (पश्चिम) येथील ड्रिम्स मॉलच्या बेसमेंटमध्ये श्रीमती मनीषा गायकवाड-भिसे नाव असलेल्या एका ४० वर्षीय महिलेचा मृतदेह दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास सापडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेमुळे संपूर्ण भांडुप परिसरात खळबळ उडाली असून, भांडुप पोलिसांनी तिच्या अपमृत्यूची नोंद केली असून कथित प्रियकराला अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशी काय आढळून आले व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही,

सदर प्रकरणी भांडूप पोलीस ठाणे येथे दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी अपमृत्यु नोंद कमांक १२/२०२५, कलम १९४ भा.ना.सु.सं. अन्वये नोंद करण्यात आली आहे. मयत महिलेचे शवविच्छेदनानंतर मृतदेहाचा व्हिसेरा व इतर मुद्देमाल रासायनिक विश्लेषकाचे परीक्षणकामी पाठविण्यात आलेला आहे. अहवाल प्राप्त झालेनंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे. प्रस्तूत प्रकरणी अधिकचा तपास पोलीसांकडून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पडघा (ता.भिवंडी, जि.ठाणे) केंद्रातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३७) १९४८ (०५-०५-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पडघा (ता.भिवंडी, जि.ठाणे) वांद्रे, सौर, समतानगर बोरिवली, भादाणे केंद्रातील जिल्हा परिषद मराठी शाळेत चार वर्गात एकच शिक्षक असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी वांद्रे येथील शाळेत सातवीपर्यंत शिक्षण असून १२५ विद्यार्थी आणि तीन शिक्षक, सौर शाळेत पहिली ते चौथी ५८ विद्यार्थी आणि एकच शिक्षक, समतानगर ३४ विद्यार्थी आणि एक शिक्षक तसेच भादाणे शाळेत २५ विद्यार्थी अणि एकच शिक्षक असल्याची चिंताजनक बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात शालेय शिक्षण विभागाचे "प्रत्येक शाळेत किमान दोन शिक्षक" हे धोरण असूनही भिवंडी तालुक्यात मंजूर शिक्षकांच्या संख्येपेक्षा सुमारे २७० शिक्षकांची पदे रिक्त असून क्रेंद प्रमुख व शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या २५ मंजूर पदांपैकी केवळ सातच कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ठिकाणी शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या आठ मंजूर पदांपैकी केवळ दोनच पदे कार्यरत असून एकाकडे गटशिक्षणाधिकारी पदभार तर दुसऱ्याकडे शालेय पोषण आहाराचे अतिरिक्त काम देण्यात आले असून गट शिक्षणाधिकारी पद गेल्या पाच वर्षांपासून रिक्त असल्यामुळे लोकधारा प्रतिष्ठानचे अध्यक्ष यांनी उपरोक्त समस्यांवर तोडगा काढण्यासाठी गटविकास अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांना निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त ठिकाणच्या शाळेतील सर्व रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०१-१२-२०२५) :** (१) व (२) जिल्हा परिषद शाळा भादाणे व जि.प. शाळा बोरीवली येथे संचमान्यतेनुसार प्रत्येकी मंजूर २ पदे असून प्रत्येकी १ रिक्त पद आहे. जि.प.शाळा पडघे नं १ येथे संचमान्यतेनुसार मंजूर ८ पदे असून रिक्त पद १ आहे. जि.प.शाळा सोर येथे मंजूर २ पदे असून रिक्त पद १ आहे. जि.प.शाळा वांद्रे येथे मंजूर ६ पदे असून रिक्त पदे ३ आहेत.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

(५) माहे फेब्रुवारी २०२५ अखरे भिवंडी गटात विस्तार अधिकारी श्रेणी ३ संवर्गाची पदोन्नतीने रिक्त २ पदे भरण्यात आली आहेत. तसेच ठाणे जिल्ह्यात केंद्रप्रमुख मंजूर १०३ पदांपैकी ५२ पदे विभागीय मर्यादित परीक्षेद्वारे भरावयाची सर्व पदे रिक्त असल्याने आता सदरची पदे मर्यादित परीक्षेद्वारे भरण्यात येणार आहेत. तसेच पेसा अंतर्गत भरती प्रक्रियेला मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल असल्याने शिक्षक भरतीची प्रक्रिया स्थगित आहे. यास्तव विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून दिनांक १५.०७.२०२४ च्या शासन पत्रान्वये कंत्राटी स्तरावर मानधनावर पेसा अंतर्गत शिक्षक भरतीची परवानगी देण्यात आलेली आहे.

---

## राज्यातील अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या पदनिर्मिती व प्रशिक्षण योजनेच्या कामांना तात्काळ मंजूरी मिळणेबाबत

**(३८) १९५३ (०५-०५-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुस्लिम, बौध्द, पारशी, ज्यू, ख्रिश्चन, जैन आणि शिख या अल्पसंख्याक समुदायाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी बार्टी, सारथी, महाज्योती व अमृत संस्थांच्या धर्तीवर अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये राज्यात स्थापन झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे वेतन, कार्यालयीन खर्च, मागासलेपण अभ्यास आणि विद्यार्थी प्रशिक्षणासाठी रु.६ कोटी २५ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संस्थेचे मुख्य कार्यालय छत्रपत्री संभाजीनगर येथे असून १० पदे मंजूर असून सुध्दा त्याला सचिव उच्चस्तरीय समितीची मान्यता नसल्याने पदनिर्मिती झालेली नाही तसेच संस्थेच्या संचालकपदाचा कार्यभार जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सोपवण्याचा आला असून देखील काही महिन्यांचा कालावधी उलटून संस्थेचे काम ठप्प असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवे शैक्षणिक वर्ष लवकरच सुरु होणार असल्याने अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असून सदरहू विद्यार्थ्यांना MRTI संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी ५ हजार विद्यार्थ्यांना UPSC/MPSC/NEET/JEE व तत्सम परीक्षांसाठी परीक्षांसाठी निशुल्क प्रशिक्षण मिळणे शक्य असून संस्थेतील पदनिर्मिती, संचालक नियुक्ती आणि प्रशिक्षण योजनेसाठी किमान रु.१५ कोटींचा निधी मंजूर करण्याबाबत मा.उपमुख्यमंत्री (वित्त् व नियोजन) आणि मा. राज्यमंत्री अल्पसंख्यांक यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (३०-१०-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे,

अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था या संस्थेच्या मंजूर १० पदांना उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच संस्थेच्या संचालकपदाचा कार्यभार जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सोपवण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता. तथापि, विधानसभा निवडणूक कार्यक्रमामुळे सदर कार्यभार जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आला नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) या संस्थेतील पदांच्या वेतनावरील खर्च, कार्यालयीन खर्च तसेच संस्थेच्या बांधकामासाठी येणारा खर्च भागविण्यासाठी नवीन लेखाशीर्ष घेण्याची आणि संस्थेच्या मंजूर १० पदांना सचिव उच्चस्तरीय समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही विभागाकडून सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

## राज्यातील MSEDCL द्वारे सहाय्यक अभियंता (AE) व कनिष्ठ अभियंता (JE) निवड यादीची तपासणी करण्याबाबत

**(३९) २०५६ (२७-०४-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील MSEDCL द्वारे सहाय्यक अभियंता (AE) व कनिष्ठ अभियंता (JE) निवड यादीत जवळपास १११ सलग नावे विशिष्ट केंद्रावरून दिसून आल्याने अर्जदारांनी जे अत्यंत संशयास्पद आहे त्यांची तपासणी करण्याची मागणी माहे जानेवारी, २०२५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २१ जानेवारी, २०२५ पासून सुरू होणाऱ्या कागदपत्र पडताळणी प्रक्रियेसाठी GATE संबंधित कोणतेही पुरावे नमूद केले नसल्याने अधिक शंका निर्माण झाल्यामुळे दस्तऐवज पडताळणी गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, CBT व GATE गुणांचे वजन कसे मोजले गेले याबाबत स्पष्टता देणे, सर्व उमेदवारांचे गुण प्रकाशित करुन पारदर्शकता राखणे, यादीतील सलग नावे व संशयास्पद पॅटर्नची चौकशी करण्याची आवश्यकता अर्जदारांमार्फत व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी यादी काढून पुन्हा प्रकाशित करण्यामागचे कारण काय आहे व त्यानुषंगाने GATE गुणांचे योग्य पडताळणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच कोणत्याही भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणि निष्पक्षता हे अत्यंत महत्त्वाचे असल्याने यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही, तथापी याबाबत उमेदवारांकडून निवेदन प्राप्त झाले आहे. निवड झालेल्या उमेदवारांची पडताळणी IBPS संस्थेमार्फत केली असता निवड यादीत विशिष्ट परिक्षाकेद्रांमधुन १११ सलग नावे निवड झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) हे खरे नाही. महावितरणच्या संकेतस्थळावर दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजी निकालासोबत निवड झालेल्या उमेदवारांना ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या अनुषंगाने उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे, पडताळणी दरम्यान सादर करण्याबाबत आवश्यक सुचना प्रसारीत करण्यात आलेल्या होत्या. तसेच ऑनलाईन अर्ज सादर करतांना GATE पात्रताधारक उमेदवारांनी त्यांचे GATE Score Card आपलोड करण्याची सुविधा देण्यात आली व तसे ऑनलाईन अर्जामध्ये बंधनकारक करण्यात आले होते. तसेच निवड यादी प्रकाशीत झालेनंतर दिनांक २१/०१/२०२५ ते २८/०१/२५ रोजी सर्व आवश्यक कागदपत्रांसह GATE Score Card ही तपासण्यात आलेली आहेत.

(३) हे खरे नाही, तथापी याबाबत निवेदन प्राप्त झालेले असुन जाहिरात क्र. ०७/२०२३ च्या अनुषंगाने दिनांक ३०/०१/२०२४ रोजीच्या शुद्धीपत्रकान्वये उमेदवारांची निवड ही ऑनलाईन क्षमता चाचणी मधील प्राप्त गुणांचे ९०% व GATE पात्रताधारक उमेदवारांचे GATE SCORE चे १०% अशी दोन्हींची मिळून १०० पैकी गुण ग्राह्य धरून निवड यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सोबतच प्रवर्गनिहाय cut-off गुणांचा तक्ता प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्याच बरोबर उमेदवारांना त्यांचे प्राप्त गुण डाऊनलोड करून घेणे करिताची URL Link दिनांक ०५.०२.२०२५ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली.

(४) महावितरणच्या संकेतस्थळावर सहाय्यक अभियंता व कनिष्ठ अभियंता व इतर पदांचा निकाल प्रसिध्द केल्यानंतर संकेतस्थळाला भेट देणाऱ्या वापरकर्त्यांची/उमेदवारांची संख्या अचानक वाढल्यामुळे तांत्रिक अडचण

येऊन संकेतस्थळ काही काळासाठी बंद झाले होते. सदर संकेतस्थळाची तांत्रिक अडचण सोडविल्यानंतर सदर पदांचा निकाल पुनश्चः उपलब्ध (Restore) झाला. त्यामुळे सुरूवातील प्रकाशीत झालेली यादी काढुन पुन्हा प्रकाशीत करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. मातंसं/२०२२/प्र.क्र.०१/से-२/३९, दिनांक १८/०१/२०२२ व सह सचिव, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, यांचे दिनांक २३ जून, २०२० रोजीच्या पत्रान्वये भरती प्रक्रिया IBPS या संस्थेमार्फत घेण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने भरती प्रक्रिया ही IBPS या संस्थेमार्फत घेण्यात आली आहे. तसेच परिक्षेदरम्यान अनुचित कार्यांना प्रतिबंध करण्याकरिता CC Biometric Authentication, Ratina Scan, Mobile Jammer इ. उपाययोजना करण्यात आल्या होत्या व सदर परिक्षा या सुरळीत पार पडलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अल्पसंख्यांक तसेच अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या धर्तीवर अनुसूचित जातीतील नवबौध्दासह या घटकांना इयत्ता पहिली पासून शिष्यवृत्ती लागू करण्याबाबत..**

**(४०) २२०२ (२४-०४-२०२५). श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना केंद्राच्या आदेशानुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लागू असून त्यातच त्यांना अनुसूचित जाती (एसटी) विद्यार्थ्यांना देखील पहिलीपासून सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त शिष्यवृत्ती लागु करण्यात आली आहे हे लक्षात घेता त्याच धर्तीवर अनुसुचित जातीतील नवबौध्दासह या घटकांना शासनाकडून अद्यापपर्यंत कोणतीही शिष्यवृत्ती मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थ्यांना इयत्ता पहिलीपासून शिष्यवृत्ती लागू करावी, यासाठी संबंधित पालकांनी माजी मंत्री तथा मा.स्थानिक लोकप्रतिनिधीं यांची भेट घेऊन त्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन शासनाकडे सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार अनुसुचित जाती व नवबौध्दांसह योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (२०-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात सर्व जिल्हयांमध्ये स्वतंत्र अल्पसंख्याक कक्ष सुरु करण्याबाबत**

**(४१) २२०७ (०५-०५-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात शासन निर्णय आविवि ६५२३/प्र.क्र.७२/का.१ दिनांक १४ मार्च, २०२४ नुसार “स्वतंत्र अल्पसंख्याक कक्ष” सुरु करण्याबाबत अल्पसंख्याक समाजातील नागरीकांची मागणी

आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा नियोजन समितीत उचित संख्येत मुस्लिम अल्पसंख्याक समाजसेवी महिला, प्रोफेशनल वर्ग च्या प्रतिनिधींना समावेश करणे तसेच पंतप्रधान योजनेंतर्गत जिल्हाधिकारी/तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्याक समाज विकास कार्य समिक्षा समिती स्थापन करण्यात येवून सदर समितीत अल्पसंख्याक समाजाच्या सर्व घटकातील १० ते १५ लोकांची नियुक्ती करून दर महिन्याला सभा आयोजित करण्यासंदर्भात शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनधी यांच्याकडे देखील मागणी करण्यात येत असून शासनाने यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१८-११-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) अल्पसंख्याकांसाठीच्या सर्व योजनांचा तळागाळातील अल्पसंख्याक समूदायास लाभ मिळवून देण्याचे उद्दीष्ट सफल होण्याकरिता योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली
दिनांक १४ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हास्तरावर अल्पसंख्याक कक्ष निर्माण करुन सदर कक्षांसाठी
एकूण ८५ पदे निर्माण करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत.

**(४२) २२१३ (२८-०४-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १०० टक्के अनुदानित १६ आयुर्वेद व ३ युनानी महाविद्यालये व संलग्न रुग्णालय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या अखत्यारीत व संचालक आयुष, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिपत्याखाली असून शासनाकडून अनेक वर्षापासून १०० टक्के वेतन अनुदान मिळते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना उच्च व तंत्र, शालेय शिक्षण, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या शासन अनुदानित शाळा, महाविद्यालये, कला, वाणिज्य, विज्ञान विधी, फार्मसी, अभियांत्रिकी इ. मधील कर्मचाऱ्यांना ज्या ज्या सेवाविषयक सवलती शासनामार्फत दिल्या जातात त्या मात्र दिल्या जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना वैद्यकीय शिक्षण विभागाच्या क्रमांक एडीआर-२०२६ /प्र.क्र.४१/आयु-२ दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी अथवा नंतर सेवेत लागलेल्या कर्मचाऱ्यांना लागू केलेली DCPS/NPS या वेतन योजना ७ वर्षाचा कालावधी उलटून गेला तरी त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी शासनाकडून केलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त योजना लागू न करता ती कर्मचाऱ्यांचा १२ टक्के कर्मचारी हिस्सा तसेच शासन हिस्सा + व्यवस्थापन हिश्श्याची १२ टक्के रकक्म वेतनातून कपात करून अजूनही भविष्य निर्वाह निधी कार्यालयात CPF (कॉन्स्ट्रीब्युटरी प्रॉव्हीडंट फंड) अंशदायी भविष्य निर्वाह निधी म्हणून भरणा करण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीनुसार दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ या तीन वर्षीय कालावधीची थकबाकीची रक्कम कर्मचाऱ्यांना अद्याप मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार आयुर्वेद कर्मचाऱ्यांना DCPS/NPS योजना लागू करणे तसेच तीन वर्षाची थकबाकी रोखीने अदा करण्याबाबत तसेच CPF खात्यात जमा करण्याबाबतची कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०६-११-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय दिनांक १० ऑगस्ट, २०१६ नुसार, दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ नुसार परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू केली आहे. त्यानुसार संचालनालय स्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे.
(४) होय खरे आहे.
(५) व (६) शासन निर्णय दिनांक २९ मार्च, २०२५ मध्ये नमूद कार्यपद्धतीनुसार कर्मचाऱ्यांचे PRAN क्रमांक तयार करण्याची कार्यवाही प्रगती पथावर असून, संस्थांकडून नोंदणीकरणाची विहीत प्रपत्रे भरून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या रकमेसंदर्भातील तसेच CPF संदर्भातील कार्यवाही करणे शक्य होईल.

---

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या शिवशाही बसेसचे वाढलेले अपघात**

**(४३) २२७५ (२५-०४-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या शिवशाही बसचे सातत्याने होणारे अपघात, ब्रेकडाऊन, बसमध्ये एसी बंद, सीट कव्हर आणि पडदे अस्वच्छ मुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याच्या तक्रारीनुसार बसेसचे वाढते अपघात विचारात घेता महामंडळाच्या ताफ्यातील सर्व शिवशाही बसेसची तपासणी करण्याचे आदेश प्रशासनाने राज्यातील सर्व विभाग प्रमुखांना दिनांक २८ डिसेंबर, २०२४ रोजी दिलेले होते, हे खरे आहे काय,
(२) तसेच अकोला विभागांतर्गत २८ शिवशाही बसची तपासणी करण्यात आली आहे काय आणि सांगली जिल्ह्यात ३८ शिवशाही बसेसचे आर्युमान संपले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या तपासणीमध्ये काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुषंगाने अपघात रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०३-१२-२०२५) :** (१) होय.

(२) अकोला विभागातील सर्व शिवशाही वाहनांची तपासणी करण्यात आली आहे. तसेच रा. प. महामंडळातील कोणत्याही शिवशाही वाहनाचे आयुर्मान संपलेले नाही.

(३), (४) व (५) दिनांक २६ डिसेंबर, २०२४ रोजी केलेल्या तपासणीमध्ये आढळून आलेल्या त्रुटींची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करण्यात आलेली आहे. तसेच तपासणी दरम्यान कोणत्याही त्रुटी निदर्शनास आल्यास त्याची दुरुस्ती त्वरीत करण्यात येत आहे.

---

**माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील वारकरी संप्रदायाच्या श्री संत मुक्ताबाई पालखीमार्गाला राज्यमार्गाचा दर्जा देऊन सदर रस्त्याचे काम करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४४) २२७९ (२८-०४-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील वारकरी संप्रदायाच्या परंपरेनुसार भूम-वारदवाडी-पापनस-वडशिंगे-माढा-उपळाई- शेटफळ मार्गे पंढरपूर या श्री संत मुक्ताबाई पालखीमार्गाला राज्यमार्गाचा दर्जा देऊन सदर रस्त्याचे काम करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-११-२०२५) :** (१) होय, निवेदन प्राप्त आहे.

(२) रस्त्याच्या दर्जोन्नती करीता शासन परिपत्रक क्र.संकिर्ण -२०२४/प्र.क्र.६५/नियो-२, दिनांक २०/०७/२०१६ मध्ये नमुद निकषाच्या अधिन राहुन उचित कार्यवाही करणेचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पेडगाव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील धर्मवीर गडावर छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक बांधण्याबाबत**

**(४५) २३३२ (२५-०४-२०२५). श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेडगाव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील धर्मवीर गडावर महादेवाची प्राचीन १२ मंदिरे असून या किल्याचे क्षेत्रफळ सुमारे ३५० एकर आहे या किल्यास १२ महाद्वार व ५२ पेठा आहे, भव्य हत्तीमोट, प्राचीन कोरीव चित्र मंदिर, महाराजांचा भव्य स्मृती स्तंभ असून हा किल्ला तटबंदी असून पाणी योजनेसाठी खपराच्या पाईपलाईनद्वारे पाणी व्यवस्थापन केले जात होते परंतु सद्य:स्थितीत या किल्ल्याची दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरातत्व विभागाच्या काही जाचक अटींमूळे या किल्याची होत असलेली पडझड, सुशोभिकरण, वृक्ष लागवड याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्याप्रमाणे तुळापूरला छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक निधी उपलब्ध करून उभारले गेले

त्याचप्रमाणे पेडगाव येथील धर्मवीर गड येथे महाराजांचे स्मारक उभारण्यास शासनाने निधी उपलब्ध करुन पुरातत्व विभागास किल्याचे सुशोभीकरण व डागडुजी करण्यास योग्य त्या सुचना निर्गमित करुन कार्यवाही करण्यात यावी, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ब्रिटीशकालीनचे जे जाचक नियम होते, त्याचे पालन पुरातत्व विभाग करित असून त्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असून याबाबत शासन स्तरावर काही निर्णय घेतला गेला आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पेडगाव येथील धर्मवीर गडावर छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक बांधण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (११-०७-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पाणी व्यवस्थापनाची व्यवस्था सुधारण्याची आवश्यकता आहे.

बहादूरगड, मौजे पेडगाव, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर हा भुईकोट किल्ला असंरक्षित स्मारक आहे. सदर किल्ल्याच्या आता सहा मंदिरे व इतर अवशेष आहेत. आतील सहा मंदिरांपैकी  दोन मंदिरे (बालेश्वर मंदिर व लक्ष्मीनारायण मंदिर) ही केंद्र संरक्षित स्मारक म्हणून घोषित झालेली असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, औरंगाबाद मंडळ यांच्या अखत्यारीत आहेत. बहादूरगड या असंरक्षित स्मारकास राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्याची कार्यवाही संचालनालयाकडून सुरू आहे.

(२) हे खरे नाही.

सदर स्मारकावर पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाच्या पूर्व-परवानगीने दुर्गपेमी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामार्फत स्वच्छता अभियान राबविण्यात येते.

(३) बहादुरगड या असंरक्षित स्मारकास राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्याची कार्यवाही संचालनालयाकडून सुरू करण्यात आली असून सदरहु स्मारक राज्य संरक्षित स्मारक घोषित केल्यानंतर सदरहु स्मारकाचे जतन व सवंर्धन पुरातत्वीय संकेतानुसार करण्यात येईल.
(४) हे खरे नाही.
(५) सदरहू स्मारकाच्या ऐतिहासिक महत्व लक्षात घेता सदर स्मारक राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील औषधांची व त्यांच्या गुणवत्तेची तपासणी करणेबाबत

**(४६) २३९२ (०५-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (ता.अंबाजोगाई, जि. बीड) येथे रुग्णांना निष्क्रिय व बनावट औषधींचा पुरवठा करण्यात येत असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या तपासणीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा घटना राज्यातील जवळपास १० ते ११ शासकीय महाविद्यालय व रुग्णालयात निदर्शनास आल्या असल्याचे निदर्शनास आले आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गंभीर प्रकार महाविद्यालय व रुग्णालयातील प्रमुखाच्या संगनमताने घडत असल्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे राज्यातील सर्वच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील मागील पाच वर्षापासून खरेदी करण्यात आलेल्या संपूर्ण औषधांची व त्यांच्या गुणवत्तेची तपासणी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग यांचेकडे दिनांक १४ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे. हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तयात काय आढळून आले, त्यानुसार संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०७-१०-२०२५) :** (१) होय.स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (ता. अंबाजोगाई, जि. बीड) येथे फक्त एका औषधी बाबत असे घडले होते , दिनांक १८ ऑक्टोबर, २०२४ रोजी FDAकडून Tab. Azithromycin ५०० mg Bach no. Atmq/६७२०२२ चा तपासणी अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालामध्ये संबंधित औषध Not of Standard Quality (Spurious) असे नमूद करण्यात आले होते. तोपर्यंत Tab. Azithromycin ५०० mg Bach no. Atmq/६७२०२२ या औषधाचा साठा रुग्णालयात निरंक झालेला होता व त्या कालावधीमध्ये कोणत्याही रुग्णास त्याची बाधा / reaction झाली नाही. तसेच ज्या संस्थांमध्ये साठा उपलब्ध आहे त्या संस्थांना तात्काळ वापर थांबविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(२) होय.
(३) होय.
(४) सदर बनावट औषध पुरावठादारावर FDA कार्यालयाकडून FIR दाखल करण्यात आले आहे व त्या पुरवठादारास संस्थास्तरावर काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. तसेच या बनावट औषध गैरप्रकारात शासकीय अधिका-याची जबाबदारी निश्चित करण्याच्या सूचना आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांना करण्यात आल्या आहेत. तसेच दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी शासन पत्रान्वये संचालनालयाच्या अधिनस्त संस्थांमधील रुग्णांना गुणवत्तापूर्ण औषधे वेळेवर उपलब्ध होण्यासाठी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### खांदा कॉलनी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील शीव मंदिरासमोरील अपघात रोखण्यासाठी कार्यवाही करण्याबाबत

**(४७) २८८० (२६-०४-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सायन-पनवेल महामार्गावरील खांदा कॉलनी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील शीव मंदिरासमोर सुरक्षिततेच्या अभावी भरधाव वेगात जाणाऱ्या वाहनांमुळे अपघात सदृस्य परिस्थती निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विभागात माहे जानेवारी, २०२५ या महिन्यात झालेल्या अपघातात रस्ता ओलांडणाऱ्या दोन जणांना मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे व नियोजन शुन्य कारभारामुळे

अपघात होऊन मृत्यू होण्याचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने होणारे अपघात रोखण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

माहे जानेवारी, २०२५ मध्ये झालेल्या अपघातात रस्ता ओलांडणाऱ्या दोन पादचारी इसम यांचा मृत्यू झाला आहे. सदर बाबतीत कामोठे पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ०२/२०२५ अन्वये गुन्हा दाखल आहे.
(३) व (४) सदर ठिकाणी यापुढे अपघात होऊ नयेत म्हणून आवश्यक त्या उपाययोजना करणेबाबत कळंबोली वाहतूक शाखा, नवी मुंबई मार्फत संबंधित महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे, पनवेल महानगरपालिका या आस्थापनेस लेखी कळविण्यात आले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे व पनवेल महानगरपालिका यांचेकडून सदर ठिकाणी खालीलप्रमाणे, उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.
१) सदर ठिकाणी दोन्ही लेनवर सुमारे १० मीटर लांबीचे रंम्बलर पट्टे मारण्यात आलेले आहेत.
२) पादचारी यांनी रस्ता ओलांडू नये असे नमूद केलेले बोर्ड बसविण्यात आलेले आहेत.
३) बंद असलेली विद्युत व्यवस्था सुरू करण्यात आलेली आहे.
४) सदरचे ठिकाणी दैनंदिन पेट्रोलिंगकरीता बिट मार्शल यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच इतर बाबींची पुर्तता करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील मुलुंड येथील रात्रशाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिकेला दाखल्यासाठी लाच घेताना अटक केल्याबाबत

**(४८) २९०५ (२५-०४-२०२५). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मुलुंड येथील रात्रशाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका यांनी रु.१९०० इतक्या रुपयांच्या लाचेची मागणी केल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळा सोडल्याच्या दाखल्या करिता एकाकडून साडेसहाशे तर दुसऱ्या व्यक्तीकडून साडेबाराशे रुपयाची मागणी मुख्यध्यापिकेने केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा प्रकारच्या लाच घेण्याच्या घटनांना आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१०-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मुलुंड नाईट स्कुल, मुलुंड (पश्चिम), मुंबई या रात्रशाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका यांनी फिर्यादी व त्यांचे जावई यांना शाळा सोडण्याचा दाखला देण्यासाठी फिर्यादी यांचे दाखल्याचे रु. ६५०/- व जावई यांचे दाखल्याचे रु. १२५०/- अशा रक्कमेची मागणी करून ती स्विकारल्याने आलोसे प्रभारी मुख्याध्यापिका यांचे विरूध्द ला.प्र.वि. मुंबई विभाग येथे दिनांक २२ जानेवारी, २०२५ रोजी गु.र.क्र. ०५/२०२५ कलम ७, भ्रष्टाचार

प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अन्वये गुन्हा दाखल करून नमूद आलोसे यांना अटक करण्यात आली आहे.
(३) भ्रष्टाचारासंबंधी प्राप्त तक्रारींची खातरजमा करुन लाच स्विकारणारे लोकसेवकांना लाचेचा सापळा प्रकरणी अटक करुन गुन्हे दाखल करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उपस्थित होत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील पोलीस दलाला प्राथमिक तथा मुलभूत सोयीपासून वंचित रहावे लागत असल्याबाबत**

**(४९) ४७६० (२५-०४-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील पोलीस दलाला त्यांना वेळेवर वेतन, गस्तीसाठी वाहन, राहण्याची चांगली सुविधा, पेट्रोलसाठी भत्ता, पुरेसे मनुष्यबळ, दूरध्वनी, कार्यालय, स्वच्छतागृह इत्यादी मुलभूत सोयीपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली जिल्ह्यात २६ पोलीस ठाणी असुन जिल्ह्यातील पोलीस दलात नवनवे तंत्रज्ञान येत असतनाही प्राथमिक सुविधाचा अभाव असल्याने त्यांचा कामावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१०-२०२५) :** (१) व (२) नाही,

सांगली जिल्हा पोलीस दलामध्ये कार्यरत पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदारांना वेळेवर वेतन अदा करण्यात येते. सांगली पोलीस दलासाठी एकूण १६५ चारचाकी व २१० दुचाकी वाहने उपलब्ध असून सदर वाहनांकरीता पेट्रोल, डिझेल व वंगणासाठी निधी उपलब्ध आहे. सांगली जिल्हा पोलीस दलाकरीता पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध असून कार्यरत पोलीस अधिकारी व अंमलदारांकरीता शासकीय निवासस्थाने उपलब्ध आहेत.

तसेच सांगली पोलीस दलाच्या आस्थापनेअंतर्गत पोलीस अधीक्षक कार्यालय, पोलीस मुख्यालय, ६ उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व २६ पोलीस ठाणे कार्यरत असून दुरध्वनी, स्वच्छतागृह इत्यादी मुलभूत सुविधा पुरविण्यात आल्याने कामावर विपरीत परिणाम झालेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील मुंबई सेंट्रल टर्मिनसला नाना शंकरशेठ यांचे नाव देणे बाबत.**

**(५०) ८०२४ (०७-०८-२०२५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय रेल्वेचे जनक, मुंबईचे आध्य शिल्पकार नामदार जगन्नाथ नाना शंकरशेठ यांचे नाव मुंबई सेंट्रल टर्निमनसला दयावे अशी मागणी मुंबईतील नागरिकांची अनेक दिवसापासून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीच्या पूर्ततेसाठी मुंबईत आंदोलने होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनान चौकशी करुन मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (२५-११-२०२५) :** (१), (२), (३) व (४) "मुंबई सेंट्रल टर्मिनस" या रेल्वे स्थानकाचा नामविस्तार "नाना शंकर शेठ मुंबई सेंट्रल टर्मिनस" असे करण्याबाबतचा निर्णय दिनांक १२ मार्च, २०२० रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. सदर निर्णय दिनांक २७ जुलै, २०२० रोजीच्या शासन पत्राने केंद्रीय गृह मंत्रालयाला कळविण्यात आला आहे. सदर विषयाबाबत राज्य शासनाने वेळोवेळी केंद्रीय गृह मंत्रालयाकडे पाठपुरावा केलेला आहे. सदर प्रस्तावास केंद्रीय गृह मंत्रालयाची अंतीम मान्यता प्रतीक्षाधीन आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.